मुंबई विद्यापीठाच्या निकालाच्या On-Screen Marking System (OSM) ची सखोल चौकशी करण्याकरिता त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- समिती २०१७/प्र. क्र. ५५३/१७/विशि-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - १२ डिसेंबर, २०१७.

प्रस्तावना :-

मुंबई विद्यापीठाला १५० वर्षांची ऐतिहासिक परंपरा असून सदर विद्यापीठास हेरिटेज दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे सदर विद्यापीठामधून शिक्षण घेण्यास विद्यार्थी उत्सुक असतात. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ४८(१)(ड) नुसार व अग्रवाल समितीच्या शिफारशीनुसार सर्व विद्याशाखेतील उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन हे ऑनस्क्रिन पध्दतीने करुन जलद गतीने निकाल लावण्याच्या दृष्टीने परीक्षा पध्दतीमध्ये पारदर्शकता आणणे, मानवी हस्तक्षेप टाळणे इ. साठी हा निर्णय घेण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पहिल्या सत्राचे निकाल लागण्यास मुंबई विद्यापीठाकडून झालेल्या अक्षम्य विलंबाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान इत्यादीबाबत सन २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात मा. सदस्यांनी विविध आयुधाव्दारे सदर प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सदर प्रकरणी चौकशी समिती नेमून सखोल चौकशी करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुषंगाने विद्यापीठाच्या On-Screen Marking System (OSM) पध्दतीची सखोल चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पहिल्या सत्रातील परीक्षांचे निकाल लागण्यास झालेल्या विलंबाच्या अनुषंगाने विद्यार्थ्याचे हित लक्षात घेऊन मुंबई विद्यापीठाच्या निकालाच्या On-Screen Marking System (OSM) ची सखोल चौकशी करण्याकरीता खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	पदनाम
१	प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
२	डॉ. धिरेन पटेल, संचालक, व्ही.जे.टी.आय. मुंबई	सदस्य
३	डॉ. दीपक फाटक, आयआयटी, पवई, मुंबई	सदस्य

२. समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

१) On-Screen Marking System (OSM) प्रणालीबाबत तांत्रिक बाबींचे समुचित मुल्यांकन (Comprehensive evaluation) विद्यापीठ प्रशासनाने OSM प्रणाली अंमलात आणण्यापूर्वी केली होती काय?

२) मुंबई विद्यापीठाचे निकाल On-Screen Marking System (OSM) व्दारे लावण्याचा निर्णय घेताना विद्यापीठ प्रशासन, शिक्षक, विद्यार्थी यांची पूर्वतयारी होती काय?

३) निविदा प्रक्रिया नियमानुसार पूर्ण करण्यात आली काय?

४) विद्यापीठ प्रशासन, शिक्षक आणि मेरिट ट्रॅक कंपनी हे तांत्रिक अडचणींना तोंड देण्यासाठी तांत्रिकदृष्टया सक्षम होते काय? इत्यादी बाबी तपासणे.

३. सदर समितीचे अध्यक्ष प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई हे राहतील. सदर समिती आवश्यकतेनुसार मुंबई विद्यापीठात बैठका घेईल. संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुंबई हे उक्त समितीच्या बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित राहून आवश्यक ती सर्व व्यवस्था व सहाय्य करतील. समितीने आपला अहवाल दोन महिन्यात शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२१२१४४३३३३५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2017.12.14 15:49:19 +05'30'

(सिध्दार्थ खरात)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
५) डॉ. धिरेन पटेल, संचालक, व्ही.जे.टी.आय., मुंबई.
६) डॉ. दीपक फाटक, आयआयटी, पवई, मुंबई.
७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
९) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) मा. अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१२) सह सचिव (विशि) यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई
१३) निवडनस्ती.